मंगळवार दि. ३० जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९९ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेरुन्नुता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# प्रभाग क्रमांक १६ मधील वीज समस्यांवर शिवसेनेच्या नगरसेवकांचा आक्रमक पवित्रा; महावितरणला निवेदन

## वारंवार वीज खंडित होणे, धोकादायक विद्युत तारा, डीपी व खांबांच्या समस्यांकडे लक्ष वेधले; तातडीने कार्यवाहीचे महावितरणचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये गेल्या काही दिवसांपासून वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिक त्रस्त झाले असून, या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेनेच्या नगरसेवकांनी महावितरण प्रशासनाची भेट घेत विविध वीज समस्यांबाबत सविस्तर निवेदन सादर केले. नागरिकांना दिलासा मिळावा आणि प्रलंबित प्रश्न तातडीने सोडवावेत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



शिवसेनेच्या नगरसेविका दर्शना दीदी झोल खोतकर, नगरसेविका उषाताई पांगरकर, नगरसेवक अमोलभैय्या ठाकूर, नगरसेवक निखिल दादा पगारे तसेच जनसेवक किशोरभैय्या पांगारकर यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता अतुलजी देवकर यांची भेट घेऊन प्रभागातील विविध समस्यांची माहिती दिली.

यावेळी नगरसेवकांच्या वतीने कार्यकारी अभियंता अतुलजी देवकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर झालेल्या बैठकीत प्रभागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या वीज समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

नगरसेवकांनी सांगितले की, प्रभाग क्रमांक १६ मधील अनेक भागांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. विशेषतः उन्हाळा व पावसाळ्याच्या काळात वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे घरगुती कामे, व्यवसाय, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे.

निवेदनामध्ये अनेक ठिकाणी विद्युत तारा धोकादायक पद्धतीने खाली झुकलेल्या असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. या तारा नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करत असून भविष्यात अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा ठिकाणी तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेण्याची मागणी करण्यात आली.

तसेच अनेक भागांमध्ये झाडांच्या फांद्यांमधून विद्युत तारा गेल्यामुळे वारा किंवा पावसाच्या काळात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याचे नगरसेवकांनी सांगितले. त्यामुळे त्वरित ट्री कटिंग मोहीम राबवून वीजवाहिन्या मोकळ्या करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रभागातील वाढती लोकसंख्या आणि वाढलेला वीज वापर लक्षात घेता काही भागांमध्ये नवीन डीपी बसविण्याची गरज असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच ज्या ठिकाणी डीपी शिफ्टिंगची कामे प्रलंबित आहेत, ती तातडीने पूर्ण करावीत, नवीन वीज खांब उभारावेत आणि वीज वितरण यंत्रणा अधिक सक्षम करावी, अशी मागणी करण्यात आली.

शिवसेनेच्या चारी नगरसेवकांच्या वतीने प्रभाग क्रमांक १६ मधील सर्व वीजविषयक समस्या प्राधान्याने सोडविण्यात याव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षिततेशी आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या या प्रश्नांकडे महावितरणने गांभीर्याने पाहावे, असेही त्यांनी सांगितले.

यावर महावितरणचे कार्यकारी अभियंता अतुलजी देवकर यांनी संबंधित समस्यांची तातडीने दखल घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, तसेच प्राधान्यक्रमाने कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन दिले.

यावेळी नगरसेवक गुड्डूभैय्या खान, सदेशभैय्या कक्कड, बाबा पांगारकर, राहुलभैय्या रायकर, गजानन भाऊ पाखरे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक १६ मधील वीज समस्यांबाबत लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या पुढाकारामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, महावितरण प्रशासनाच्या पुढील कार्यवाहीकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### विरोधाभासाची चर्चा; नेमके वास्तव काय ; वीजपुरवठा सुरळीत की समस्या कायम?

**जालना शहरातील वीज समस्येच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेतूनच समोर आलेल्या दोन वेगवेगळ्या चित्रांमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी शिवसेना नेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन शहरातील वीज समस्यांबाबत सूचना केल्या होत्या. त्यानंतर अनेक भागांत वीजपुरवठा सुरळीत झाल्याचे सांगितले जात होते. इतकेच नव्हे तर वीजपुरवठ्यात सुधारणा झाल्याच्या पार्श्वभूमीवर काही नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचा सत्कार करून आभारही व्यक्त केले होते. त्यामुळे शहरातील वीज समस्या मोठ्या प्रमाणात मार्गी लागल्याचा संदेश नागरिकांमध्ये गेला होता.**

**मात्र, याच शिवसेनेचे प्रभाग क्रमांक १६ मधील नगरसेवकांनी महावितरणला निवेदन देत वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्या, धोकादायक विद्युत तारा, डीपीची कमतरता, नवीन खांबांची आवश्यकता आणि ट्री कटिंगसारखे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे शहरातील सर्वच भागांमध्ये वीजपुरवठा सुरळीत झाला आहे का, की काही भागांमध्ये समस्या अद्याप कायम आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

**विशेष म्हणजे, एका बाजूला वीज समस्या सुटल्याबद्दल आमदारांचा सत्कार होत असताना दुसऱ्या बाजूला त्याच पक्षाचे नगरसेवक वीज समस्यांबाबत निवेदन देत असल्याने राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर विरोधाभास दिसून येत आहे.**

**दरम्यान, प्रभागनिहाय समस्या वेगवेगळ्या असू शकतात आणि काही भागांमध्ये सुधारणा झाली असली तरी काही भागांमध्ये प्रश्न अद्याप कायम असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महावितरण प्रशासनाने शहरातील वस्तुस्थिती स्पष्ट करून सर्व भागांतील वीज समस्यांचे सर्वंकष निराकरण करणे आवश्यक असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.**

# नसरापूर प्रकरणात न्यायाचा विजय

## आरोपीला फाशीची शिक्षा, बालहक्क संरक्षण आयोगाकडून निर्णयाचे स्वागत!

### बालकांवरील अत्याचार करणाऱ्यांना कायद्याचा कठोर इशारा : डॉ. संजय लाखेपाटील

**जालना - प्रतिनिधी**

नसरापूर येथील अल्पवयीन बालिकेवरील अत्यंत गंभीर अत्याचार प्रकरणात पुणे सत्र न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावून कठोर आणि ऐतिहासिक निर्णय दिला आहे. या निकालाचे महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने स्वागत केले असून, हा निर्णय बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या न्यायव्यवस्थेवरील समाजाचा विश्वास अधिक दृढ करणारा असल्याचे आयोगाचे सदस्य डॉ. संजय लाखेपाटील यांनी म्हटले आहे.

या प्रकरणात गुन्हा घडल्यानंतर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवत सातत्याने पाठपुरावा केला. तपास यंत्रणा, महिला व बाल विकास विभाग, वैद्यकीय अधिकारी, सरकारी अभियोक्ता, साक्षीदार आणि संबंधित सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी समन्वयाने केलेल्या कार्यामुळे न्यायालयात भक्कम पुरावे सादर झाले आणि आरोपीला कठोर शिक्षा मिळाली. या सर्व यंत्रणांचे आयोगाने विशेष अभिनंदन केले आहे. डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले की, बालकांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वेळेवर तक्रार, संवेदनशील तपास, पुराव्यांचे शास्त्रशुद्ध संकलन आणि प्रभावी न्यायालयीन मांडणी किती महत्त्वाची असते, हे या निकालातून स्पष्ट झाले आहे. हा निकाल केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नसून, बालकांवर अत्याचार करणाऱ्यांना कायद्यापासून कोणतीही सुटका नाही, असा स्पष्ट आणि कठोर संदेश देणारा आहे.

या प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांनी अल्पावधीतच अत्यंत सबळ पुरावे गोळा करून न्यायालयाच्या कसोटीवर टिकणारे दोषारोपपत्र दाखल केले.

त्यांच्या कर्तव्यदक्षतेमुळेच हा निकाल शक्य झाला असून, त्यांनी केलेली कामगिरी निश्चितच कौतुकास्पद असल्याचेही डॉ. लाखेपाटील यांनी नमूद केले. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने पालक, शिक्षक, सामाजिक संस्था आणि नागरिकांना बालकांच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. बालकांवरील कोणत्याही प्रकारचा अत्याचार, शोषण किंवा संशयास्पद घटना निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित यंत्रणांना माहिती देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. बालकांचे संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाचे सामूहिक कर्तव्य आहे. प्रत्येक बालक सुरक्षित, सन्मानजनक, भीतीमुक्त आणि बालस्नेही वातावरणात वाढावे, यासाठी महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग कायम कटिबद्ध राहील, असा ठाम निर्धार डॉ. संजय लाखेपाटील यांनी व्यक्त केला.



**डॉ. संजय लाखेपाटील म्हणाले की, नसरापूर प्रकरणात महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने गुन्हा घडल्यानंतर प्रत्येक स्तरावर बारकाईने लक्ष ठेवून सातत्याने पाठपुरावा केला. न्यायालयाने दिलेली फाशीची शिक्षा ही कायद्यातील सर्वात कठोर शिक्षा असून, या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. या शिक्षेची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी, हीच अपेक्षा आहे. अशा कठोर शिक्षेमुळे बालकांवर अत्याचार करण्याचे धाडस करणारे नराधम गुन्हा करण्यापूर्वी दहा वेळा विचार करतील. संबंधित पोलिस अधिकाऱ्यांनी अल्पावधीत सबळ पुरावे गोळा करून न्यायालयात टिकणारे दोषारोपपत्र दाखल केले. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ आणि परिणामकारक कामगिरीबद्दल ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत.**

**- डॉ. संजय लाखेपाटील**

# संजय अंपलकर यांची सहाशे किमी सायकल मोहीम यशस्वी



**जालना -प्रतिनिधी** : जिद्द, सातत्य आणि मित्रांच्या भक्कम पाठबळाच्या जोरावर फॅब रनर व जालना सायकलिस्ट ग्रुपचे सायकलपटू संजय अंपलकर यांनी ६०० किलोमीटरची बीआरएम (ब्रेवेट रॅण्डोनियर्स मॉन्डिअल) सायकल मोहीम अवघ्या ३९ तासांत पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली.

छत्रपती संभाजीनगर येथील फिनिक्स रॅण्डोनियर्सतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेला शुक्रवार दि. २६ जुलै रोजी पहाटे ५.३० वाजता सुरुवात झाली. छत्रपती संभाजीनगर ते तुळजापूर आणि पुन्हा छत्रपती संभाजीनगर असा ६०० किलोमीटरचा खडतर प्रवास संजय अंपलकर यांनी जिद्दीने पूर्ण केला. या यशामुळे जालना जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या यशाबद्दल फॅब रनर व जालना सायकलिस्ट ग्रुपतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना संजय अंपलकर भावूक होत म्हणाले, या मोहिमेदरम्यान कदाचित माझी प्रॅक्टिस कमी पडली असेल, पण माझ्या मित्रांचे पाठबळ कधीच कमी पडले नाही. स्वतःपेक्षाही मित्रांचा आपल्यावर जास्त विश्वास असतो. तो विश्वास आणि प्रोत्साहन यामुळेच मी ही ६०० किलोमीटरची मोहीम यशस्वीपणे पूर्ण करू शकलो. कोणत्याही सायकलपटूसाठी मित्रांच्या विश्वासामुळे मिळणारा अभिमान हा सर्वात मोठा पुरस्कार असतो.

यावेळी जालना सायकलिस्ट व फॅब रनर ग्रुपचे प्रशांत भाले,अर्जुन जगताप, प्रशांत भाले, काशिनाथ मोरे, मिलिंद खेरुडकर, भास्कर पवार, मनोज कुमकर, केशरसिंग राजपूत, अजय सिंगला, शिवाजी हिवराळे, मिलिंद *(पान २ वर)*

# पॅकिंग चार्जेसच्या नावाखाली ग्राहकांची लूट

## गजानन भोजनालयाविरोधात अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार

**जालना - प्रतिनिधी**

जालना, दि. ३० जून : जालना शहरातील गजानन भोजनालयात ग्राहकांना अन्नपदार्थ पार्सल देताना स्वतः च्या नावाचा व जाहिरातीचा लोगो असलेल्या पॅकिंग कंटेनरसाठी स्वतंत्र पॅकिंग चार्ज आकारला जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एका जागरूक नागरिकाने अन्न व औषध प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली असून गजानन भोजनालय मालकावर कारवाईची मागणी केली आहे. राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे कर्तव्यदक्ष आयुक्त तुकाराम मुंढे यांनी भेसळ, नियमभंग आणि ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात सुरू केलेल्या धडाकेबाज



Shree Gajanan Bhojnalay
Mama Chowk Jalna
Mob - 9404694638
GSTIN:27ANwPk3790J2Z5
fssai.no 11515045000063
Name:
Date: 29/06/26 13:32 Pick Up
Cashier: biller Bill No.: 4443

| Item | Qty. | Price | Amount |
|---|---|---|---|
| चपाती लिमिटेड थाली | 2 | 160.00 | 320.00 |
| Packing | 12 | 8.00 | 96.00 |

Total Qty: 14 Sub Total 416.00
320.00@ SGST 2.5% 8.00
320.00@ CGST 2.5% 8.00
Grand Total ₹432.00
Thanks For Ordering

कारवाईच्या पार्श्वभूमीवर ही तक्रार महत्त्वाची मानली जात आहे.

तक्रारीनुसार, तक्रारदाराने २९ जून रोजी गजानन भोजनालयातून दोन राईस प्लेट पार्सल घेतले असता अवघ्या ३२० रुपये अन्नपदार्थांच्या किमतीव्यतिरिक्त तब्बल ९६ रुपये पॅकिंग चार्ज आकारण्यात आला. *(पान २ वर)*



आज वटसावित्री पौर्णिमेनिमित्त काळुंका माता मंदिर येथे महिला भगिनींनी वटवृक्षाची मनोभावेपूजा करून जन्मोजन्मी हाच पती मिळू दे अशी देवाला प्रार्थना करून प्रदक्षणा घातल्या ***छायाचित्र किरण खानापुरे***

# संपादकीय....

## परीक्षांचा बाजार आणि उद्ध्वस्त होत चाललेला विश्वास

महाराष्ट्रातील लाखो तरुणांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा () ही केवळ एक परीक्षा नसते, तर ती शिक्षक होण्याच्या स्वप्नाची, स्थैर्याच्या नोकरीची आणि आयुष्य बदलण्याच्या संधीची वाट असते. मात्र, २८ जून २०२६ रोजी होणारी परीक्षा संभाव्य पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर पुढे ढकलण्यात आल्याने पुन्हा एकदा राज्यातील परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काही दिवसांपूर्वीच परीक्षेतील गैरप्रकारांमुळे देशभरात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर आता शिक्षक पात्रता परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न बाहेर आल्याचा संशय व्यक्त होत असल्याने महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ही घटना केवळ एका परीक्षेपुरती मर्यादित नाही, तर ती संपूर्ण भरती आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींचे विदारक वास्तव समोर आणणारी आहे. प्रश्नपत्रिका फुटते कशी? ती कोणाकडे पोहोचते? तिचा आर्थिक व्यवहार कोण करतो? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या संपूर्ण साखळीमागील सूत्रधार कोण? या प्रश्नांची उत्तरे आजपर्यंत अनेक प्रकरणांमध्ये पूर्णपणे समोर आलेली नाहीत. परिणामी, दोषींमध्ये दहशत निर्माण होण्याऐवजी अशा रॅकेटचे धाडस वाढत असल्याचे दिसून येते.

परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय हा प्रशासनाच्या दृष्टीने आवश्यक आणि योग्य असला, तरी त्याची किंमत लाखो विद्यार्थ्यांना मोजावी लागत आहे. अनेक उमेदवारांनी प्रवासाचे आरक्षण केले होते, काहींनी राहण्याची व्यवस्था केली होती, तर अनेक जण महिनोनमहिने अभ्यास करून परीक्षेच्या अंतिम टप्प्यावर पोहोचले होते. त्यांच्या मानसिक तणावाची, आर्थिक नुकसानीची आणि भविष्यावरील अनिश्चिततेची जबाबदारी कोण घेणार, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आज परीक्षा रद्द किंवा पुढे ढकलली जाते; उद्या पुन्हा परीक्षा घेतली जाते; काही महिन्यांनी पुन्हा गैरप्रकार उघडकीस येतात. हा दुष्टचक्राचा खेळ थांबणार कधी? पेपरफुटीच्या घटनांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा तरुणांच्या भवितव्याशी, शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी आणि राज्याच्या प्रशासकीय क्षमतेशी संबंधित विषय आहे. यासाठी केवळ खालच्या स्तरावरील दलाल किंवा मध्यस्थांना अटक करून भागणार नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते वितरणापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे स्वतंत्र ऑडिट करणे, डिजिटल सुरक्षा वाढविणे, दोषींवर कठोर आणि जलद शिक्षा करणे तसेच परीक्षा व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणणे अत्यावश्यक आहे.

शिक्षक घडविणाऱ्या परीक्षेवरच संशयाची सावली पडणे हे कोणत्याही समाजासाठी चिंताजनक आहे. कारण शिक्षक हा समाजाचा भविष्यनिर्माता असतो आणि त्या शिक्षकांच्या निवड प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले, तर त्याचा परिणाम संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर होतो.

महाराष्ट्रातील तरुणांना संधी हवी आहे, सवलत नाही; न्याय हवा आहे, सहानुभूती नाही; आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांना विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था हवी आहे. पेपरफुटी प्रकरणाने पुन्हा एकदा राज्य शासन, परीक्षा यंत्रणा आणि तपास यंत्रणांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. आता वेळ केवळ चौकशीची नाही, तर व्यवस्था बदलण्याची आहे. अन्यथा प्रत्येक परीक्षा ही विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा नसून संशयाची परीक्षा बनत जाईल आणि त्याची सर्वात मोठी किंमत देशाच्या तरुण पिढीला मोजावी लागेल.

# परीक्षा पद्धत बदल, अन्यथा, ही पेपरफुटी अटळ...?

...आजवर विद्यार्थ्यांचा पेपर फुटत होता, पण आता जे विद्यार्थी घडवतात, त्या मास्तरांची पात्रता सिद्ध करणाऱ्या परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे मोठा गहजब उडाला आहे. म्हणजे जे मास्तर विद्यार्थी घडवतात, त्यांना शिक्षणाचे आणि नैतिकतेचे धडे देतात. देशाचे नागरिक घडवतात, त्या मास्तरांचा पेपर फुटला आहे. महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा (टीईटी) पेपर आदल्याच दिवशी म्हणजे २७ जून रोजी ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे फुटल्याचे उघडकीस आले. या पेपरफुटीमुळे ६ लाखांपेक्षा जास्त परीक्षार्थींचे नुकसान झाले असून परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षे (नीट) नंतर टीईटी पेपरफुटी झाली. त्यामुळे याला चाप लावण्यासाठी अत्याधुनिक विज्ञान, माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात परीक्षापद्धतीत बदल होण्याची गरज निर्माण झाली आहे. दहावी, बारावी किंवा इतर महत्वाच्या परीक्षांचे पेपर याआधीही फुटत होते.

परंतु व्हॉट्सॲप किंवा प्रसार समाज माध्यमे त्याकाळी एवढी सक्षम नव्हती. आज फुटलेला पेपर काही सेकंदात हजारो उमेदवारांपर्यंत पोहचवला जातो. त्यामुळे परीक्षार्थीचे होणारे नुकसानही त्याच वेगाने वाढते. टीईटी आणि नीटसारख्या मोठ्या परीक्षांचे पेपर फुटतात, तेव्हा त्याचे परिणाम फक्त एका दिवसापुरते मर्यादित नसतात. ही दुर्घटना एका बाजूला पात्र उमेदवारांचे भवितव्य अंधारात ढकलते, तर दुसऱ्या बाजूला त्यांच्या कुटुंबाला मानसिक आणि आर्थिक गर्तेत लोटले जाते. यातून होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांनी हा विषय कमालीचा गंभीर होतो, यातून विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाचा अंदाज येऊ शकतो.

स्पर्धा परीक्षांची तयारी हा आता एक मोठा आर्थिक व्यवहार झाला आहे. उमेदवारांची वाढती संख्या आणि नियुक्ती तसेच शिक्षण संधीच्या घटणाऱ्या जागा असे हे व्यस्त प्रमाण आहे. पेपरफुटीतून आर्थिक नुकसान होतेच, मात्र विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला तडा जातो. व्यवस्थेवरील विश्वास उडाल्याने प्रामाणिकपणा, मेहनत आणि अभ्यास करूनही यशाची खात्री नसल्याने विद्यार्थी हताश होतात. सरकारी, खासगी शिक्षणसंस्थापेक्षा खासगी क्लासेसकडून होणाऱ्या शिक्षणाच्या व्यावसायिकरणाला पाठबळ मिळते. राज्यातील शिक्षण संस्थांची स्थिती पाहता बेकायदा इंटीग्रेशनची वाढती व्यवस्था पेपरफुटी आणि शिक्षणाच्या बाजारीकरणाला खतपाणी घालणारी असल्याचे आजपर्यंतच्या अनुभवातून स्पष्ट होते. यातून पालकांची क्षमता नसताना प्रसंगी कर्ज काढून लाखो रुपयांचे कोचिंग क्लासेस पाल्यांसाठी लावले जातात. त्यासाठी शेती, मालमत्ता, दागिनेही गहाण ठेवणे, विकून टाकण्याचे प्रकार होतात. शिक्षण व्यवस्थेच्या बाजारीकरणातून गरीब विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे अतोनात शोषण होत असते.



पेपरफुटीनंतर वर्षभराची मेहनत आणि भविष्यातील स्वप्नांना एकत्रच सुरूंग लागतो. परीक्षा, प्रवास, पाठ्यपुस्तकांचा खर्च वाया जातो, परीक्षा रद्द झाल्याने पुन्हा तसाच खर्च नव्याने परीक्षेसाठी करावा लागणार असल्याने खर्चाचा बोजा दुपटीने वाढतो. जे विद्यार्थी दोन-दोन वर्षे प्रामाणिकपणे दहा, चौदा तास अभ्यास करतात, त्यांना बसलेल्या मानसिक धक्क्याचा अंदाज लावता येत नाही. विद्यार्थ्यांचे मनोधैर्य खचून गेल्याने त्यातून होणारे नुकसान त्यांच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करते. पुढील परीक्षा तरी पारदर्शकपणे होईल का? त्यात गैरप्रकार झाले तरी ते लपवले जातील का, या विचारांमुळे विद्यार्थ्यांचे नैराश्य कमालीचे वाढते.

पेपर फुटल्यानंतर त्या वर्षाची परीक्षा रद्द झाल्यावर गेलेल्या वेळेचे आणि वाढलेल्या वयाचे नुकसान भरून निघणारे नसते. वय निघून गेल्याने अपात्रतेमुळे शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींना मुकावे लागते. प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेपेक्षा लबाडीला संधी मिळत असल्याचे समोर आल्यानंतर मूल्यांवरील उडालेला विश्वास जास्त हानीकारक असतो. फुटलेल्या पेपरची खरेदी, विक्रीतून विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासापेक्षा गुन्हेगारी मानसिकता वाढीस लागते. वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा देशाच्या, राज्याच्या शिक्षण आणि परीक्षा पद्धतीवरील विश्वास पूर्णपणे उडून जात आहे. अभ्यास करून काही फायदा नाही, शेवटी वशीला आणि पैसाच चालतो, अशी नकारात्मक भावना तरुणांमध्ये निर्माण होते, जी समाजासाठी अत्यंत घातक आहे.

भिवंडीतील टीईटी पेपरफुटी प्रकरण हा नियोजनबद्ध आंतरराज्य संघटित गुन्हेगारीचा प्रकार असल्याचे समोर आले आहे. या कारस्थानाच्या पुढील तपासात आणखी गोष्टी उघड होतीलच. मात्र आपल्याकडील पारंपरिक परीक्षा पद्धत ही आधुनिक तंत्रसाधनांच्या आव्हानापुढे कमालीची कमकुवत असल्याचे अशा घटनांतून वारंवार स्पष्ट होत आहे. नीट परीक्षेच्या गोंधळानंतर आलेल्या अनुभवातून टीईटी साठी उपाययोजना केली गेली असतानाही पेपर फुटला. प्रश्नपत्रिकेची वाहतूक, साठवणूक आणि वितरण पद्धतीमधील तांत्रिक कमकुवतपणामुळे आरोपींना पेपर आधीच मिळवण्यात यश आल्याचे समोर आले आहे.

आजच्या डिजिटल युगात जुन्या पद्धती वापरून पेपर सुरक्षित ठेवणे अशक्य झाले आहे. याच डिजिटल माध्यमांचा वापर करून पेपरफुटीतील त्रुटी कमी करता येतील. त्यासाठी तंत्रज्ञ आणि शिक्षण विभागांनी एकत्रीत उपाययोजना करण्याची गरज आहे. प्रश्नपत्रिकेच्या साठवणुकीचा वेळ अत्यंत कमी करणे गरजेचे आहे,

शिवाय वॉटरमार्क, युनिक कोडींग यंत्रणेतील दोष दूर करता येतील. गोपनियतेसाठी परीक्षा यंत्रणेत दोन किंवा तीन व्यक्तींवरच जबाबदारी असायला हवी. अत्याधुनिक तंत्राचा वापर करून होणारा गैरवापर कसा रोखता येईल, यावर अभ्यास व्हायला हवा. पेपर प्रश्नांच्या निवडीपासून ते परीक्षा पद्धतीपर्यंत सर्वच घटकांमधील दोषांचे निराकरण करण्याची गरज आहे. पेपरफुटी रोखण्यासाठी पेपर फुटून लीक झाल्याचा परिणाम नियंत्रित ठेवण्यासाठी प्रश्न निवडीपासून ते परीक्षेपर्यंतचे सर्वच घटक दोषरहित करायला हवे. त्यातील त्रुटी कमी करणे शक्य आहे, गरज आहे ती इच्छाशक्तीची. कारण काळ बदलत आहे, त्यानुसार परीक्षा पद्धतीतही बदल करावे लागतील. अन्यथा, ही पेपरफुटी अटळ आहे, असे वाटते.

**ह.भ.प. शिवाजी विठ्ठल चौगुले**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर**

# मनपा शिक्षकांचे वेतन दर महिन्याच्या १ तारखेलाच करा: शेख अब्दुल रहीम

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

''शिक्षकांना त्यांच्या हक्काच्या वेतनासाठी आणि न्याय्य मागण्यांसाठी जर वारंवार प्रशासनाचे उंबरठे झिजवावे लागत असतील, तर हे अत्यंत दुर्दैवी आहे. जून महिना संपत आला तरी मे महिन्याचे वेतन शिक्षकांच्या खात्यात जमा झालेले नाही. मनपा शिक्षण विभागाची ही दिरंगाई आणि उदासीनता आता सहन केली जाणार नाही,'' अशा शब्दांत हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटनचे राज्य प्रवक्ते शेख अब्दुल रहीम यांनी मनपा शिक्षण विभागाच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांबाबत २४ फेब्रुवारी २०२६ रोजी मनपा प्रशासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले होते. मात्र, चार महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही त्यावर साधी प्रशासकीय हालचाल झाली नाही. त्यामुळे शेख अब्दुल रहीम यांनी आज मनपाचे महापौर मा. श्री. समीर सुभाष राजुरकर आणि मनपा शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तिनगोटे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन पहिले स्मरणपत्र सादर केले आणि शिक्षण विभागाला जागे करण्याचा प्रयत्न केला.

**...तर हे आर.टी.ई. कायद्याचे थेट उल्लंघन!**

या स्मरणपत्रात शेख अब्दुल रहीम यांनी प्रचलित शासन निर्णय () आणि कायदेशीर नियमांच्या चौकटीवर बोट ठेवत मनपा शिक्षण व वित्त विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत:

वेतनाची अनिश्चितता ( प्रणालीचा फज्जा): दरमहा १ तारखेला वेतन मिळणे हा शिक्षकांचा मूलभूत अधिकार असताना, मनपा शिक्षकांचे वेतन सातत्याने विलंबाने होत आहे. जून महिना संपत आला तरी मे २०२६ चे वेतन अद्याप मिळालेले नाही. वेतनावरील तांत्रिक त्रुटी दूर करून दरमहा १ तारखेला वेतन देण्याचे कायमस्वरूपी आदेश काढण्याची मागणी यात करण्यात आली आहे.

एक शिक्षक ( ) शाळांचा प्रश्न: बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम () २००९ च्या कलम २५ नुसार प्रत्येक शाळेत किमान २ शिक्षक असणे बंधनकारक आहे. मात्र, मनपाच्या काही शाळा केवळ एका शिक्षकावर चालवून आर.टी.ई. कायद्याचे थेट उल्लंघन केले जात आहे, याकडे निवेदनात प्रकर्षाने लक्ष वेधण्यात आले.

पदोन्नतीमध्ये खो: महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी नियमावली १९८१ आणि मनपा सेवा नियमांनुसार पात्र शिक्षकांची प्राथमिक पदवीधर तसेच मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया तात्काळ राबवून रिक्त पदे भरण्यात यावीत.

शालार्थ पोर्टलवरील त्रुटी: अनेक शिक्षकांची नावे अद्यापही तांत्रिक त्रुटींमुळे चुकीच्या शाळेवर दिसत आहेत. एन.आय.सी. () च्या माध्यमातून ही दुरुस्ती युद्धपातळीवर करावी, जेणेकरून निपुण महाराष्ट्र व -+ वरील माहिती अचूक राहील.

**लोकप्रतिनिधींनी वैयक्तिक लक्ष घालावे!**

''मनपा शाळांमध्ये प्रामुख्याने गरीब, कामगार आणि वंचित घटकांतील मुले शिक्षण घेतात. शिक्षकांच्या या समस्या थेट विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे महापौर आणि विरोधी पक्षनेत्यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालून संबंधित शिक्षण व वित्त विभागाला निश्चित कालमर्यादेत (-) कार्यवाही करण्याचे कडक निर्देश द्यावेत,'' अशी मागणी शेख अब्दुल रहीम यांनी केली आहे. या स्मरणपत्राची प्रत तातडीच्या कार्यवाहीसाठी मनपा आयुक्तांनाही सादर करण्यात आली आहे. शिक्षण विभागाने यावर तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत, तर शिक्षकांच्या हक्कासाठी तीव्र संघटनात्मक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेवटी देण्यात आला आहे...


दैनिक युवा आदर्श दि. ३०-०६-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
KALYANRAO BAGAL
To New Name
KALYAN SHRIRAM BAGAL
For Passport Issuence
Add- Bagal Galli Gaon, Partur, Partur, Jalna.431501

दैनिक युवा आदर्श दि. ३०-०६-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
ANJALI KALYANRAO BAGAL
To New Name
ANJALI KALYAN BAGAL
For Passport Issuence
Add- Bagal Galli Gaon, Partur, Partur, Jalna.431501

दैनिक युवा आदर्श दि. ३०-०६-२०२६

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM
My Old Name
HARSHWARDHAN KALYANRAO BAGAL
To New Name
HARSHWARDHAN KALYAN BAGAL
For Passport Issuence
Add- Bagal Galli Gaon, Partur, Partur, Jalna.431501


# रेल्वे प्रवासातील असुरक्षितता

रेल्वे लोकल सेवा प्रवाशांची धमणी म्हणून ओळखली जाते.दररोज तिन्ही मार्गावर सुमारे सत्तर लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात.यांच्या सुरक्षेचे काय? रेल्वे प्रशासनाने मुंबईतील बॉम्बस्फोट, दहशतवादी कारवाया या निमित्ताने प्रत्येक रेल्वे स्थानकात मेटल डिटेक्टर, सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते.बॅग तपासणी यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती.त्यानंतर मात्र आवजाव घर तुम्हारा एवढी ढिसाळ सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित झाली.

रेल्वे प्रवासात धावपळ ठरलेली असते.कार्यालयात वेळेवर पोहचणे हे एकच धैय्य डोळ्यासमोर असते.त्यात लोकल उशिरा ने सुटली किंवा रद्द झाली तर कुत्रा हाल खात नाही.लोकल प्रवासातील गटबाजी इतर प्रवाशांच्या जीवावर बेतते.डब्यांत गर्दी तर असतेच त्यात गटबाजीला नवीन प्रवाशांना सामोरे जावे लागते.रेल्वे प्रवास दिवसेंदिवस जीव घेणा ठरत आहे.रेल्वे प्रवासात दरवाजा बंद करण्यावरून झालेल्या वादातून तरुणाचा खून झाला.याला जबाबदार कोण? रेल्वे प्रशासनाने याचे उत्तर देणे आवश्यक आहे.रेल्वेच्या हद्दीत प्रवाशाकडे शस्त्र आले कसे ? सक्षम सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित आहे तर तपासणीत शस्त्र कसे सापडले नाही.असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होतात.रेल्वे प्रवासात जेष्ठ महिला, पुरुष , आजारी रुग्ण, लहान मुले ,मालाची ने - आण करणारे व्यापारी असतात यांच्या भवितव्याची चिंता कोणाला? त्यांच्या कुटुंबीयांनी कोणावर विश्वास ठेवायचा नशीबावर की रेल्वे यंत्रणेवर ?

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**
**mahadeogolvaskar@gmail.com**

पान १ व ४ वरुन...

### संजय अंपलकर...

वासनिक, डॉ. दिलीप दिवटे, कैलास मस्के, राम हळनोर, डॉ. सतीश शेकडे, संजय काबरा, ॲड. ईश्वर बिल्लोरे, किसन जाधव, दशरथ पडोळ, विष्णू पाटेकर, ॲड. धर्मेश उजवणे यांच्यासह क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पॅकिंग चार्जेसच्या...

याशिवाय २.५ टक्के एसजीएसटी आणि २.५ टक्के सीजीएसटी प्रमाणे १६ रुपये विक्रीकर देखील आकारण्यात आल्याचेही बिलात नमूद आहे. विविध कंटेनर, फॉईल व पॅकिंग साहित्याचा खर्च म्हणून ९६ रुपये आकारल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. विशेष म्हणजे, पॅकिंगसाठी वापरण्यात आलेल्या या कंटेनरवर भोजनालयाची स्वतःची जाहिरात छापलेली असून अशा कंटेनरसाठी स्वतंत्र पॅकिंग चार्ज आकारणे नियमबाह्य असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यापूर्वी स्पष्ट केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधित भोजनालयाविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. तसेच ग्राहकांकडून आकारण्यात येणाऱ्या एसजीएसटी व सीजीएसटीचा शासनाकडे नियमानुसार भरणा केला जातो का, याची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

या तक्रारीसोबत संबंधित बिलाची प्रत आणि पॅकिंग कंटेनरचे छायाचित्रे पुरावा म्हणून जोडण्यात आली आहेत.

### टेंभुर्णीच्या डॉक्टर...

गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. त्यांना प्रभु हनुमानाची प्रतिमा भेट देण्यात आली. या सोहळ्याप्रसंगी सुरेश दिवटे, दशरथ सोळंके, मोहन मुळे, गिरीष साबदे, रमेश भोपळे, प्रभाकर गायकवाड, ॲड. राजेंद्र मगर, डॉ. रमेश हरणे, कैलास खंडेलवाल, नंदलाल गवळी, गणेश विभुते यांच्यासह परिसरातील नागरिक, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, जाफराबादसारख्या ग्रामीण भागातील क्रीडापटूंनी मिळवलेले हे यश सध्या संपूर्ण तालुक्यात कौतुकाचा विषय ठरले आहे.

शुल्क विभागाचे पोलीस निरीक्षक रमेश विठोरे यांनी ४२ किलोमीटरचे अंतर ४ तास ५२ मिनिटांत पूर्ण केले. २१ किलोमीटरच्या अंतरामध्ये ब्रह्मानंद भिसे यांनी २ तास ३५ मिनिटांत अंतर कापले. एकनाथराव घाटगे यांनी २तास ५२ मिनिटांत अंतर कापले. डॉ. सावळे, राहुल मस्के आणि निलेश सुरुशे या तिघांनीही २१ किलोमीटरचे अंतर प्रत्येकी ३ तासांत पूर्ण केले. _चौकट :-पिंपळखुटा येथील ७७ वर्षीय धावपटू उत्तमराव गुंड यांनी १० किलोमीटरचेअंतर अवघ्या १ तासात पार केले. सर्वांचे लक्ष वेधून घेतले. जिद्दीला वय नसते. आणि जास्त वयातही जिद्द कामी येत असते. हे दाखवून देण्याचं काम ७७ वर्षे उत्तमराव गुंड यांनी दाखवून दिले. _ यासोबतच रत्नागिरीत आयोजित राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत प्रथम बक्षीस मिळवून तालुक्याचे नाव उंचावणाऱ्या १८ वर्षीय तरुणी तृप्ती ज्ञानेश्वर जाधव हिच्या देदीप्यमान यशाचाही यावेळी स्पर्धकांमध्ये विशेष गौरव करण्यात आला. या सर्व धावपटूंनी मिळवलेल्या यशातून आणि आरोग्याप्रती असलेल्या जागरूकतेतून समाजाला प्रेरणा मिळावी. त्यांचे आयुष्य निरोगी व सुखकर व्हावे. हाच या सत्कारामागील मुख्य उद्देश असल्याचे वीर हनुमान मंदिर संस्थानच्या वतीने सांगितले.

### आंतरराष्ट्रीय स्तरावरील...

आहे. यावेळी प्रांतातील वरिष्ठ पदाधिकारी, लायन लीडर्स आणि मोठ्या संख्येने सदस्य उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मेडलने सन्मानित करण्यात आल्याबद्दल सुनील बियाणी यांचे जालना लॉयन परिवाराचे अध्यक्ष सुभाष देविदान, माजी प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया, अतुल लड्डा, राधेश्याम टिबडेवाल, शंकर सवादे, द्वारकादास मुदंडा , जयश्री लड्डा , मंजु श्रीमाली, अरुण मित्तल आणि संपूर्ण जालना लायन परिवाराच्या सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

### पत्रकारांच्या हक्कासाठी...

प्रदान करण्यात आली.नवनिर्वाचित पदाधिकारी पद / जबाबदारी जुनेद मिर्झा मराठवाडा प्रदेश सचिव, ॲड. आदिल खुर्रम खान जालना जिल्हा विधी सल्लागार, मनीषा मगरे महिला जालना जिल्हा उपाध्यक्ष,

सचिन सर्वे जालना जिल्हा महासचिव, शेख अहेमद जालना जिल्हा सचिव, आरेफ सय्यद जालना जिल्हा सहसचिव, भावेश अंभोरे जालना जिल्हा मीडिया प्रभारी,

अजीम खान जालना जिल्हा प्रवक्ता, डॉ. मनोर खा पठाण, शेख अनिसौदीन जालना जिल्हा कार्यकारिणी सदस्य, शेख फेरोज जालना तालुका अध्यक्ष, अफरोज शेख परतूर तालुका अध्यक्ष, बाबासाहेब ढसाळ भोकरदन तालुका उपाध्यक्ष, जाकीर खान पठाण बदनापूर तालुका उपाध्यक्ष, मुजाहिद शेख जालना तालुका सचिव, इम्रान मिर्झा, राजेंद्र सवने, सय्यद कौसर, सय्यद शाकेर जालना तालुका सदस्य यांची अत्यंत उत्साहाच्या वातावरणात ही निवड प्रक्रिया जालन्यात पार पडली. आता या सर्व नवनिर्वाचित पत्रकार बांधवांवर केवळ संघटनेचीच नव्हे, तर पत्रकारांच्या अडीअडचणीसाठी आणि त्यांच्या हक्कासाठी धावून जाण्याची एक मोठी जबाबदारी असणार आहे.या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सध्या सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन केले जात आहे.

### जाफ्राबादमध्ये...

स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. शहरासह ग्रामीण भागातील विविध लसीकरण केंद्रांवरही मोठ्या प्रमाणात बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्यात आली. पोलिओमुक्त भारत घडविण्याची जबाबदारी केवळ शासनाची नसून प्रत्येक नागरिकाची आहे. आपल्या मुलांच्या सुरक्षित, सुदृढ आणि निरोगी भविष्यासाठी पोलिओ लसीकरण अनिवार्य आहे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

# जालना मध्ये ऊसतोड कामगारांच्या 'स्थलांतर पूर्व नियोजन' बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय

## कामगारांसाठी स्वतंत्र ओळखपत्रे, आरोग्य शिबिरे, जन्म दाखले व योजनांचा लाभ मिळवून देण्यावर भर

**जालना - प्रतिनिधी**

ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी प्रशासन व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने काम करण्याची गरज असून, कामगारांच्या सुविधेसाठी तातडीने नवीन कार्यपद्धती (एसओपी) तयार करून लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून ओळखपत्रांचे वितरण करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्था संचलित ऊसतोड कामगार प्रकल्पांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय 'स्थलांतर पूर्व नियोजन' समन्वय बैठकीत श्रीमती मित्तल अध्यक्षस्थानावरून बोलत सहाय्यक समाज कल्याण सह आयुक्त स्नेहल मोदळे , जिल्हा महिला बालविकास अधिकारी आर. व्ही. कड, शिक्षणाधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त, ऊसतोड कामगार कृती समितीचे विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत ऊसतोड कामगारांचे स्थलांतर, आरोग्य, शिक्षण, पोषण, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि सामाजिक सुरक्षा या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कामगारांचा डेटा ज्या जिल्ह्यात किंवा राज्यात ते स्थलांतरित होतात, त्या प्रशासनाशी सामायिक करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव मांडण्यात आला. यामुळे स्थलांतरित कामगारांना तेथील शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळू शकेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



**आरोग्य सेवांसाठी विशेष उपक्रम**

ऊसतोड कामगारांच्या कामाच्या वेळा लक्षात घेऊन सकाळी लवकर अथवा सायंकाळी आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिबिरांमध्ये मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच स्थलांतरित महिलांमधून ' आरोग्य सखी ' ची निवड करून त्यांना प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देण्याची योजना देखील बैठकीत मांडण्यात आले

**शिक्षण व बाल हक्कांवर भर**

ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी मंजूर झालेल्या सर्व ' संत भगवान बाबा बालिका आश्रम शाळा ' आगामी शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला देण्यात आले. याशिवाय ज्या मुलांकडे जन्मनोंदणी दाखले उपलब्ध नाहीत, त्यांच्यासाठी विशेष मोहीम राबवून जन्मदाखले उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

**हेल्पलाइनची प्रभावी अंमलबजावणी**

ऊसतोड कामगारांच्या समस्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या विविध योजनांची गावागावांत व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश समाज कल्याण विभागाला देण्यात आले.

बैठकीच्या प्रारंभी प्रकल्प संचालक आप्पासाहेब उगले संपर्क अधिकारी भाऊसाहेब गुंजाळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. तसेच जालना जिल्ह्यातील विविध योजना आणि प्रकल्प मांडणी करण्यात आली.

ऊसतोड कामगारांसमोरील समस्या, आव्हाने आणि संभाव्य उपाययोजनांवर सविस्तर सादरीकरण केले.

उसतोड कामगार ना पाणी साठी स्थलांतर होते. या संदर्भात काम करून पाणी गावात पाणी उपलब्ध करून गावात स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन १५ गावात करण्यात आले आहे.

यावेळी प्रकल्प व्यवस्थापक ओकार उगले प्रकल्प समन्वयक आश्वजित जाधव अनुप मोरे शिवाजी तायडे बिस्मीला राहुल गाढवे जिल्हा समन्वयक एकनाथ राउत राजेश वाघमारे आदींनी ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या प्रशासनासमोर मांडल्या. प्रशासन आणि स्वयंसेवी संस्थांनी एकत्रितपणे काम करून ऊसतोड कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'' जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती () यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे. कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी आपले सरकार सेवा केंद्र किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे. एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल, या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**-काशीबाई थोरात धायगुडे**
**(वरिष्ठ सहायक संचालक)**

### टेंभुर्णी येथे वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात साजरी

# सुवासिनींनी पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची मनोभावे पूजा

**दत्ता देशमुख**



टेंभुर्णीत वटपौर्णिमा उत्साहात; सुवासिनींकडून वटवृक्षाचे पूजन टेंभुर्णी :जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी व परिसरात आज वटपौर्णिमेचा सण पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. आपल्या पतीला दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे, या प्रेरणेने गावातील सुवासिनींनी सकाळपासूनच वटवृक्षाची पूजा करण्यासाठी गर्दी केली होती.महिलांनी पारंपरिक पेहराव करून वटवृक्षाला हळद-कुंकू, फळे आणि फुले अर्पण केली. वडाच्या झाडाला सुती दोरा गुंडाळून महिलांनी मनोभावे प्रदक्षिणा घातल्या आणि सात जन्माच्या सोबतीसाठी प्रार्थना केली. यंदा महिलांनी वडाच्या फांद्या तोडण्याऐवजी थेट जिवंत वटवृक्षाची पूजा करून पर्यावरणपूरक सण साजरा केला. एकमेकींची ओटी भरून सुवासिनींनी वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

### श्रीराम मंदिराच्या दानपेटीतील अपहार प्रकरण; दोषींवर कठोर कारवाई करावी!

## मंदिराच्या दानपेटीतील अर्पणातील अपहार, हे महापापच; मंदिरांचे व्यवस्थापन भक्तांकडेच हवे ! – हिंदु जनजागृती समिती

अयोध्येतील श्रीराममंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून ते जगभरातील कोट्यवधी हिंदूंच्या शतकानुशतकांच्या बलिदान, प्रदीर्घ संघर्ष आणि श्रद्धा यांचे प्रतीक आहे. मंदिराच्या दानपेटीतील अर्पणात अपहार करणे, हे महापाप असून प्रभू श्रीराम त्यांच्या कर्माची शिक्षा त्यांना देईलच. पण शासनाने या प्रकरणी कोण दोषी आहेत, याचा शीघ्रतेने तपास करून सत्य जनतेसमोर आणायला हवे आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई करायला हवी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

आम्ही यापूर्वी ही मागणी अनेकदा केली आहे की, कोणत्याही मंदिराच्या समितीमध्ये केवळ भगवंताचे भक्तच असायला हवेत. भक्त हा ईश्वराचा उपासक असल्याने तो देवनिधी चोरण्याचा विचार स्वप्नातही करू शकत नाही. खऱ्या अर्थाने मंदिरांचा उद्धार करायचा असेल, तर भगवंताचे असे भक्तच मंदिर व्यवस्थेमध्ये असावेत. अशा प्रकरणांमुळे 'मंदिर सरकारीकरण' करण्याचा प्रयत्न शासन करत असते, त्याला आमचा कायम विरोध राहिल, अशी भूमिकाही समितीने घेतली आहे.



जे सरकारी अधिकारी स्वतः भ्रष्ट असतात, जे सरकारी अधिकारी शासन यंत्रणेत खोलवर रुजलेल्या भ्रष्ट व्यवस्थेचा भाग असतात, ते सरकारी अधिकारी मंदिर समितीतील भ्रष्टाचार कसा काय रोखू शकतील. त्यामुळे धार्मिक स्थळी धर्मनिरपेक्ष शासनाचा हस्तक्षेप नकोच. मंदिरांचे सरकारीकरण केल्यानंतर मंदिराच्या निधीमध्ये भ्रष्टाचार वाढला असल्याची अनेक उदाहरणे देशभरात आहेत. या दृष्टीने भगवंताचा खरा भक्त, जो मंदिराचे दायित्व भगवंताची सेवा म्हणून स्वीकारून करेल, अशा भक्तांकडे मंदिरांचे दायित्व सोपवायला हवे, असे मत हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी व्यक्त केले.

**श्री. रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती**
**(संपर्क क्र.: ९९८७९६६६६६)**

# फाशीचा फास : न्यायव्यवस्थेचा कठोर पण आवश्यक संदेश

''न्याय उशिरा मिळाला तरी चालेल; पण तो निःपक्ष, कठोर आणि समाजाचा विश्वास वाढवणारा असला पाहिजे.'' नरसापूर येथील अवघ्या साडेतीन वर्षांच्या निष्पाप बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपी भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. हा निकाल केवळ एका खटल्याचा शेवट नाही; तर भारतीय न्यायव्यवस्थेने समाजाला दिलेला एक ठाम आणि स्पष्ट संदेश आहेबालकांवरील अत्याचार आणि अमानुष गुन्हे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत.

साडेतीन वर्षांची चिमुकली... जगाचे काहीच भान नसलेले एक निरागस फूल. तिच्या डोळ्यांत भविष्याची असंख्य स्वप्ने होती; पण एका विकृत मानसिकतेने त्या स्वप्नांचा कायमचा अंत केला. अशा वेळी संपूर्ण समाज हादरून जातो. पालकांच्या मनात भीती निर्माण होते. अशा गुन्ह्यांनंतर न्यायव्यवस्थेकडून केवळ निर्णय नव्हे, तर ठोस आणि प्रभावी न्यायाची अपेक्षा असते. भारतीय न्यायव्यवस्था मृत्युदंडाचा वापर अत्यंत मर्यादित परिस्थितीत करते. सर्वोच्च न्यायालयाने ''दुर्मिळातील दुर्मिळ'' या तत्त्वानुसारच फाशीची शिक्षा देण्याचे निकष निश्चित केले आहेत. नरसापूर प्रकरणात न्यायालयाने सर्व पुरावे, साक्षी, वैज्ञानिक तपास आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर हा निर्णय दिला. त्यामुळे हा निर्णय भावनेवर नव्हे, तर कायद्याच्या भक्कम पायावर उभा आहे. हा निकाल पीडित कुटुंबासाठी त्यांच्या दुःखाची भरपाई करू शकत नाही. त्यांच्या आयुष्यातील पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र, न्यायालयाने त्यांच्या वेदनेची दखल घेत गुन्हेगाराला कठोर शिक्षा सुनावली, ही



बाब न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारी आहे.

अनेकदा समाजात असा प्रश्न उपस्थित केला जातो की, कठोर शिक्षेमुळे गुन्हे थांबतात का? केवळ शिक्षा गुन्हे पूर्णपणे थांबवू शकत नाही; पण कठोर आणि निश्चित शिक्षा गुन्हेगारांच्या मनात कायद्याबद्दल भीती निर्माण करते. न्यायाची अंमलबजावणी वेगाने आणि ठामपणे झाली, तर त्याचा प्रतिबंधात्मक परिणाम नक्कीच होतो.

संत तुकाराम महाराज म्हणतात
''सत्य असत्याशी मन केले ग्वाही,
मानियले नाही बहुमता.''

न्यायालयानेही जनभावना किंवा भावनिक दबाव न मानता पुराव्यांच्या आधारे सत्याचा शोध घेतला आणि त्यानुसार निर्णय दिला. हेच लोकशाहीतील न्यायव्यवस्थेचे खरे सामर्थ्य आहे. या निकालातून काही महत्त्वाचे संदेश समाजासमोर येतात बालकांवरील लैंगिक अत्याचार हे क्षम्य नाहीत. कायद्यापुढे कोणताही गुन्हेगार मोठा नाही. तपास यंत्रणा, सरकारी वकील आणि न्यायालय यांनी समन्वयाने काम केल्यास पीडितांना वेळेत न्याय मिळू शकतो. न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी अशा प्रकरणांत संवेदनशीलता आणि कठोरता दोन्ही आवश्यक आहेत. मात्र, फाशीची शिक्षा हा शेवटचा उपाय आहे; पहिला नाही. समाजाने मुलांच्या सुरक्षिततेसाठी अधिक जागरूक होणे, शाळांमध्ये बालसुरक्षा शिक्षण देणे, महिलांबद्दल आणि बालकांबद्दल आदराची संस्कृती रुजवणे, तसेच संशयास्पद घटनांची त्वरित माहिती पोलिसांना देणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आज न्यायालयाने गुन्हेगाराला फाशीची शिक्षा सुनावून कायद्याचे सामर्थ्य दाखवून दिले आहे. हा निकाल सूडाचा विजय नाही; तो न्यायाचा विजय आहे. हा निर्णय प्रत्येक निरपराध बालकाला सुरक्षित बालपण देण्याच्या संविधानिक वचनबद्धतेचा पुनरुच्चार आहे. चिमुकली



परत येणार नाही, तिचे हसू पुन्हा उमलणार नाही. पण तिच्या स्मृतीतून समाजाने एक निर्धार करावाप्रत्येक बालक सुरक्षित राहील, प्रत्येक गुन्हेगाराला शिक्षा होईल आणि न्याय कधीही मूक राहणार नाही.

**-सुरेश मंत्री, अंबाजोगाई**
**संपर्क - ९४०३६५०७२२**

